# खातेदारांना जाहीर सूचना
## KYC ( Know Your Customer) अद्ययावत करणे संदर्भात

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविणेत येते कि, रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार, खातेदारांनी आपल्या बँक खात्यांसाठी KYC (आपला ग्राहक ओळखा) अद्ययावत ठेवणे अनिवार्य आहे. या संबंधित आवश्यक सूचना यड्राव बँकेच्या वेबसाईट वर व शाखेमध्ये वारंवार प्रसिद्ध केली आहे. सदर सुचनेनुसार ज्या खातेदारांनी KYC ची पूर्तता वेळेत केलेली नाही त्या खातेधारकांचे खाते गोठविणेत येईल. सबब मुळे खातेदाराचे आर्थिक नुकसान अगर गैरसोय झाल्यास बँक जबाबदार असणार नाही. ज्या खात्यांमध्ये २ (दोन) वर्षांपेक्षा ज्यास्त कालावधीकरिता कोणताही व्यवहार झालेला नाही, असे खाते निष्क्रिय (Inoperative) किंवा सुप्त (Dormant) समजण्यात येईल. अशा निष्क्रिय किंवा सुप्त खात्यांवर पुन्हा व्यवहार सुरु करणेसाठी खातेधारकांचा फोटो व KYC कागदपत्रांची पूर्तता करणे अनिवार्य आहे. तसेच ज्या खात्यांवर १० वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीकरिता कोणतेही व्यवहार झालेले नाहीत अशा खात्यावरील रक्कम रिझर्व्ह बँकेकडील DEA Fund कडे वर्ग करणेत येईल याची नोंद घ्यावी.

बँकेच्या खातेधारकांनी KYC ची पूर्तता करणेसाठी खालील कागदपत्रे शाखेमध्ये जमा करावीत.

**१. ओळखपत्र- आधार कार्ड, पॅन कार्ड( किंवा फॉर्म ६०), मनरेगा कार्ड इ. पैकी एक,**

**२. रहिवासी पुरावा दाखला- आधार कार्ड, मनरेगा कार्ड इ. पैकी एक.**

**३. एक फोटो (अद्ययावत)**

Yadrav Bank Yadrav Bank Yadrav Bank Yadrav Bank Yadrav Bank

तसेच ज्या खातेदारांचे रहिवासी पत्त्यामध्ये बदल झाला नसेल त्यांनी यड्राव बँकेच्या शाखेमध्ये उपलब्ध असलेले **"KYC बदल नसलेचे स्वयंघोषणापत्र"** जमा करणे आवश्यक आहे.

वेळोवेळी देण्यात येणाऱ्या महत्वाच्या माहिती करिता ग्राहकांनी आपल्या खात्यावर मोबाईल नंबर व ई-मेल आयडी नोंद करून सहकार्य करावे हि विनंती.

दि. ०५/०७/२०२५

स्थळ- यड्राव

सही/-

मुख्य कार्यकारी अधिकारी,

यड्राव को-ऑप बँक लि. यड्राव करिता

**मोबाईल क्र-** 7276479889

**मेल आयडी-** headoffice@yadravbank.com

**टोल फ्री क्र.-** 1800 233 1133

**वेबसाईट-** www.yadravbank.in

YADRAV BANK

YADRAV BANK

7276479889 www.yadravbank.in